लोकसत्ता ५-५-१९.

# पोलीस ठाण्यांत सायबर कक्ष

## वाढती सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस आयुक्तालयाचा निर्णय

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** वाढती सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी मिरा-भाईंदर वसई-विरारमधील प्रत्येक पोलीस ठाण्यात आता स्वतंत्र सायबर कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. यासाठी एक प्रशिक्षित सायबर तज्ज्ञ असलेला पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. यामुळे सायबर गुन्ह्यात फसवणुकीला बळी पडलेल्यांना मोठी मदत मिळणार आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय क्षेत्रात एकूण १७ पोलीस ठाणे आहे. इतर गुन्ह्यांबरोबर सायबर गुन्हेगारी देखील वाढत आहे. यामध्ये ऑनलाइन फसवणूक, आर्थिक लूट आदींचे प्रकार जास्त आहे. स्थानिक पोलिसांना दैनंदिन कामे करून सायबर गुन्ह्यांचा तपास करणे कठीण होत आहे. त्यामुळे वाढत्या सायबर गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात सायबर कक्ष तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अंतर्गत प्रत्येक पोलीस ठाण्यात प्रशिक्षित सायबर तज्ज्ञ कर्मचारी नियुक्त करण्याचा निर्णय पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी घेतला आहे. यापूर्वी सायबर प्रकरणातील तक्रारी सायबर पोलीस ठाण्याअंतर्गत जात असल्याने त्यात बराच वेळ लागत होता. मात्र आता येणाऱ्या तक्रारींचे पोलीस ठाण्यातील सायबर कर्मचारी अवलोकन करून त्यात आवश्यक ती पावले झटपट उचलणार आहेत. यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम सुरु असल्याची माहिती पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी दिली आहे. सायबर पोलीस ठाणे ही स्वतंत्र गुन्हे शाखा कार्यरत आहेत. त्यांच्याकडूनही गुन्ह्यांचा तपास केला जाणार आहे.

### पोलिसांकडून जनजागृती

वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न केले जात आहेत. यात नागरिकांना जागरूक करण्यासाठी पटनाट्य, सायबर रिल्स स्पर्धा व महाविद्यालय मार्गदर्शन शिबिराचे पोलिसांकडून आयोजन केले जात आहे. शिवाय अशा गुन्हाचा तपास करण्यासाठी स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे देखील तयार करण्यात आले आहे. पोलिसांच्या या प्रयत्नाला गेल्या काही महिन्यापासून यश देखील मिळू लागले आहे. यात प्रामुख्याने फसवणुकीत गेलेले पैसे हे वेळेत बँकेशी व नंतर न्यालयाशी पत्रव्यवहार करून तक्रारदारांना पून्हा देण्यात आले आहे. एकंदरीत सायबर गुन्हात तात्काळ तपास केल्यास पैसे परत मिळवण्याची शक्यता अधिक दिसून आली आहे.

> सायबर गुन्ह्याना रोखण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे उभे राहिले आहे. त्यामुळे तपास यंत्रणांना अधिक सक्षम करण्याच्या दुष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे पोलीस ठाण्यातच तक्रारदारांना सेवा मिळणार असून यापूर्वी होणारी धावपळ कमी होणार आहे.
>
> – मधुकर पांडे, पोलीस आयुक्त, मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय.

पुण्यनगरी ५-५-१९.

# दिवसाढवळ्या महिलेची सोनसाखळी लुटली

**। नालासोपारा :** वसई विरार शहरात पुन्हा सोनसाखळी चोर सक्रिय झाले असून, एका महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी चोरून पोबारा केला आहे. याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना सोमवारी दुपारी घडली. नालासोपारा पूर्वेकडील नेमीनाथ नगर येथे दिवसाढवळ्या एका इमारतीच्या आवारात शिरून महिलेच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोनसाखळी लंपास करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे.

नालासोपारा पूर्व येथील श्री नेमिनाथ नगर टॉवर येथील ६८ वर्षीय रिना व्होरा सोमवारी सकाळी १०.३० वाजता त्या नेहमीप्रमाणे घराजवळील पद्मावती जैन मंदिरात गेल्या होत्या. त्यानंतर दुपारी १२.३० वाजता घरी परतल्या. त्या इमारतीत शिरून लिफ्टमध्ये प्रवेश करणार इतक्यात एका तरुणाने मागून येऊन गळ्यातील सोनसाखळी खेचून पळ काढला. सोनसाखळी दीड तोळे वजनाची असून, तिची किंमत ४५ हजार रुपये होती. सीसीटीव्हीत आरोपी महिलेच्या मागावर असल्याचे दिसून आले आहे. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



CamScanner

पुण्यनगरी ५-५-१९.

# मारहाणीत मृत्यू, गुन्हेगाराला प. बंगालमधून अटक

## ४५०० रुपयांवरून झाले होते भांडण

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेतील नवघर पोलीस ठाणे हद्दीत एक व्यक्ती खून करून पळून गेला होता. याप्रकरणी आरोपीचा नवघर पोलिसांनी शोध घेऊन त्याला प. बंगाल येथून अटक केली. पोलिसांनी तपास केला असता अटक आरोपी व मृत व्यक्ती हे दोघे बरोबर राहत होते. त्यांचे साडे चार हजार रुपयांवरून भांडण झाले. त्यातून आरोपी मारहाण करून पळून गेला होता. मारहाणीत अली याचा मृत्यू झाल्याचे उघडकीस आले आहे.

१० जानेवारी रोजी एक व्यक्ती मोहम्मद मुबारक अली दारू पिऊन पडला होता व त्याच्या डोक्याला जखम झाली असल्याने त्याला उपचारासाठी केईएम रुग्णालय, परेळ येथे दाखल केले. उपचारादरम्यान मोहम्मद मुबारक अली १४ जानेवारी रोजी मृत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले होते. त्याबाबत नवघर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद केली. मृत्यूबाबत संशय वाटत असल्याने वरिष्ठांच्या आदेशाने तपास सुरू केला. तपास करताना मोहम्मद मुबारक अली व त्याचा साथीदार करीमउल्ला खान यांच्यात भांडण झाले होते. नंतर करीमउल्ला खान तेथून पळाल्याचे समजले. वैद्यकीय अहवालातून व अकस्मात मृत्यूच्या केलेल्या चौकशीतून करीमउल्ला खान याच्याविरोधात नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याची माहिती वरिष्ठांना देऊन त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे गुन्ह्याचा तपास सुरू केला.

आरोपी करीमउल्ला खान वारंवार सुलतानगंज, अलीपुर- प. बंगाल, नोएडा-दिल्ली येथे त्याचे अस्तित्व लपवत होता. नवघर पोलीस ठाणेच्या पोलीस पथकाने कौशल्यपूर्ण व तांत्रिक तपास करून आरोपी करीमउल्ला खान याला सुलतानगंज, प. बंगालमधून अटक केली. करीमउल्ला खान व मृत मोहम्मद मुबारक अली यांच्यात ४५०० रुपयांवरून वाद होऊन भांडण झाले. त्या भांडणात मोहम्मद मुबारक अली याला मारहाण केल्याचे आरोपीने सांगितले.

# देहविक्रयास प्रवृत्त करणाऱ्यास अटक

**नालासोपारा :** नालासोपाऱ्यात देहविक्रयास प्रवृत्त करणाऱ्या महिलेला नालासोपारा अनैतिक मानवी वाहतूक शाखेने अटक केली आहे. तसेच पीडित मुलीची सुटका केली. याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नालासोपारा पश्चिमेकडील एसटी डेपो रोडवरील गॅलेक्सी हॉटेलसमोर दलाल एका तरुणीला देहविक्री करण्यास भाग पाडत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक शाखेला मिळाली होती. यानुसार पथकाने सापळा रचून एका बोगस ग्राहकाला पाठवले होते. यावेळी दलाल नूर उर्फ नूरजहा खान हिने ग्राहकाशी बोलणी करून पैसे स्वीकारले. त्याचवेळी अनैतिक मानवी वाहतूक शाखेने कारवाई करत पीडितेची सुटका केली. याप्रकरणी हवालदार सुप्रिया तिवले यांच्या तक्रारीनुसार नालासोपारा पोलीस ठाण्यात देहविक्रयास प्रवृत्त करणाऱ्या महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढारी ५-५-२०.

# वसई-अर्नाळा रस्त्याची दुरूस्ती अयोग्य पद्धतीची

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई ते अर्नाळा या वसई तालुक्यातील मुख्य रस्त्याच्या दुरुस्ती व डांबराचा थर देण्याचे काम सा.बा.विभागा कडून हाती घेण्यात आलेले असून, परंतु हि दुरुस्ती करताना महत्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यात आल्याची तक्रार स्थानिक रहिवास्यांनी केली आहे. दिसते. वसई अर्नाळा रस्त्यातील काहि भाग खोलगट असल्यामुळे पावसाळ्यात थोड्याशा पावसामुळेही या रस्त्यांवर गुडघाभर पाणी सांचून वाहतुक थप्प होऊन, जनजीवन विस्कळीत होत असते. यामुळे रस्त्यावरिल खोलगट भागात समपातळीत डांबराचा थर देणे गरजेच आहे अशी मागणी करण्यात आली आहे.

या बाबतीत नाळा येथील भाऊसाहेब वर्तक शाळे जवळील गनेश पार्क ते वॉयलेट ब्युटी पार्लर पर्यंतचा सुमारे शंभर फुटाचा रस्ता फारच खोलगट असल्यामुळे येथे पाणी साचुन, धक्केहि बसतात. यामुळे येथे डांबराचा थर देऊन रस्ता समपातळीत करणे अगत्याचे आहे. या विषयावर वेळो वेळी येथील लोकांकडून तक्रारी करण्यात येतात, परंतु फंड नाही व फंड येताच काम केले जाईल, असे सांगुन वेळ मारून नेली जाते. तसेच रस्त्याची सुधारणा करताना गटारावर लक्ष देणे महत्वाचे असताना, येथेहि पुरेशी कारवाई केली जाताना दिसत नाही. कारण वसई अर्नाळा रस्त्यावर राणेभाट ते सत्पाळा तलाव येथील गटारे पुरेशी खोलगट करून गाळ काढणे गरजेच असताना याकडे दुर्लक्ष होताना दिसते.

तसेच काहि ठिकाणी गटारेचे काम सुरु आहे. परंतु त्याचे बांधकाम कमाली पेक्षा उंच केल्याने काहि ठिकाणी रस्ता अरुंद झालेला दिसतो, तर या उंचीमुळे रस्त्यावरिल पाण्याच्या निचरा होण्यासहि अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. इतकेच नाही तर या उंचीमुळे बऱ्याच वेळा रहदारीस गैरसोय होत असते. तसेच वसई अर्नाळा रस्त्यावर वारेमाप स्पिड ब्रेकर बनविण्यात आलेले आहेत.

CamScanner

पुढारी पा.नं.२.

# वादग्रस्त दर्ग्याला हटविण्यासाठी अप्पर तहसीलदारांनी बजाविली नोटीस

## दर्गा सरकारी जागेसह तिवर क्षेत्र नष्ट करून बांधल्याचे नोटिशीत नमूद; दर्गा हटविण्यासाठी २२ मार्चपर्यंतचा अल्टिमेटम

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**


मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील उत्तनच्या चौक जेट्टी जवळ सरकारी जागेत तसेच तेथील कांदळवन नष्ट करून विनापरवानगीने बांधलेला बाले पीर शाह दर्गा अनधिकृत असल्याचे स्पष्ट करीत अप्पर तहसिलदार निलेश गौंड यांनी प्राप्त तक्रारीनुसार बाले पीर शाह चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव अब्दुल कुरेशी यांना मंगळवारी नोटीस बजाविली आहे. हा दर्गा हटविण्यासाठी त्यांनी ट्रस्टला २२ मार्चपर्यंतचे अल्टिमेटम दिल्याने दर्ग्याचे बांधकाम पुन्हा वादात सापडले आहे.

हा दर्गा हटविण्याचा मुद्दा २० मे २००९ रोजीच्या विधिमंडळ अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे मांडण्यात आला होता. गेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात देखील या दर्ग्याचा मुद्दा आ. गिता जैन यांनी उपस्थित करीत त्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. दरम्यान वसईचे तत्कालीन अप्पर पोलीस अधिक्षक संग्रामसिंह निशाणदार यांनी शासनाला १८ ऑक्टोबर २०११ रोजी दर्ग्याच्या बेकायदेशीर अस्तित्वासह तेथील संभाव्य संवेदनशील घटनांबाबतचा अहवाल पाठविला होता. यंदा भाजपचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष ॲड. रवि व्यास यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त व पालिका आयुक्तांकडे पत्रव्यवहार करून बेकायदेशीरपणे बांधलेल्या दर्ग्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानुसार अप्पर तहसिलदारांनी बाले पीर शाह चॅरिटेबल ट्रस्टच्या सचिवांना १२ मार्च रोजी नोटीस बजावून दर्ग्याचे बांधकाम २२ मार्च पर्यंत हटविण्याचे आदेश दिले आहेत. तसे न केल्यास हा दर्गा शासनाकडून हटविण्यात येणार असल्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

हा दर्गा मौजे चौक येथील सर्वे क्रमांक २ जागेतील १० हजार चौरस फुट जागेत बांधण्यात आला असून मौजे तारोडी येथील सर्वे क्रमांक ३७ वरील ५७ हेक्टर दर्ग्याच्या ट्रस्टमार्फत तेथील तिवर क्षेत्र नष्ट करून त्यावर कब्जा केल्याचा आरोप व्यास यांनी केला आहे. तर या जागेच्या सातबाऱ्यावर बाले पीर शाह ट्रस्टचे नाव चढविण्यासाठी ट्रस्टच्या सचिवांनी १० ऑक्टोबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज केला होता. तो अर्ज देखी अप्पर तहसीलदारांनी फेटाळून लावला आहे.

व्यास यांनी भविष्यात या जागेत मदरसे व यात्रेकरू निवासाचे बांधकाम करण्याचे नियोजन असल्याचा आरोप केला आहे. तर पोलिसांकडून शासनाला सादर करण्यात आलेल्या अहवालात या दर्ग्याचे ठिकाण उत्तन समुद्र किनारपट्टीवर व वसई खाडीच्या मुखाशी असलेल्या चौक जेटीलगत असुन या ठीकाणापासून ५ ते ६ किलोमीटर अंतरावर मुंबईची हद्द सुरु होते. मुंबई शहरावर यापूर्वी दहशतवाद्यांनी समुद्र मार्गाने हल्ला केला असून भविष्यात दहशतवाद्यांचे मुंबई शहर लक्ष्य ठरण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे स्पष्ट केले आहे.

### राष्ट्रीय सुरक्षिततेतच्या दृष्टीने बांधकाम पाडणे गरजेचे



मुंबई व ठाणे हे दहशतवाद्यांचे लक्ष असल्याने दर्ग्याच्या ठिकाणाचा समुद्रमार्गासाठी लँडिंग पॉइंट म्हणुन गैरवापर होण्याची शक्यता देखील वर्तविण्यात आली. १९९३ च्या बॉम्बस्फोटमध्ये शेखाडी, रायगड मार्गे उत्तरविण्यात आलेली शस्त्रे, दारूगोळा व स्फोटके याचे उदाहरण पाहता या दर्ग्यापासून जवळच चौक जेट्टी असल्याने अतिरेकी तेथे येवून बोटीने हत्यारे, दारूगोळा आणून पुढे लोकल मार्गे मोठ्या शहरामध्ये नेवू शकत असल्याने एकंदरीत राष्ट्रीय सुरक्षिततेतच्या दृष्टीने या दर्ग्याचे अनधिकृत बांधकाम पाडणे गरजेचे असल्याचे अहवालात नमूद केले होते.

### ...तर खर्च ट्रस्टकडून वसूल करण्याचा इशारा

यानंतरही शासनाने या दर्ग्यावर कोणतीही कारवाई केली नाही. मात्र यंदा अप्पर तहसीलदारांनी व्यास यांच्या तक्रारीनुसार ट्रस्टच्या सचिवांना पाठविलेल्या नोटीसीवरून सरकारी कारवाई सुरु झाल्याचे निदर्शनास आले आहे. हे बांधकाम २२ मार्च पर्यंत न हटविल्यास अनधिकृत बांधकाम प्रकरणी उच्च न्यायालयात दाखल असलेल्या जनहित याचिका क्रमांक १, ३५, ३६/२००७ अन्वये तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार शासकीय खर्चाने ते बांधकाम हटविण्यात येऊन त्याचा खर्च ट्रस्टकडून महसूल थकबाकी म्हणुन वसुल करण्याचा इशारा अप्पर तहसीलदारांनी दिला आहे.

म.टा. ५-५-२०

# आठ तासच ड्युटी

## वेळापत्रक पूर्वपदावर आणण्याचा मुंबई पोलिसांचा प्रयत्न

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**



मुंबई पोलिस दलामध्ये सर्वाधिक चर्चेचा विषय ठरलेल्या आठ तास ड्युटीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. करोनामुळे बिघडलेले आठ तास ड्युटीचे वेळापत्रक पुन्हा सुरळीत करण्यासाठी चाचपणी सुरू झाली आहे. वृंद परिषदेत याबाबत चर्चा झाल्यानंतर मनुष्यबळ तसेच इतर परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे. मुंबईतील निम्म्याहून अधिक पोलिस ठाण्यांमध्ये आठ तास ड्युटीची सद्यस्थितीत अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र असून शंभर टक्के अंमलबजावणीसाठी पुन्हा प्रयत्न होत आहेत.

मुंबईची लोकसंख्या, महत्त्वाच्या घटना, कायमचा बंदोबस्त यामुळे पोलिसांवर कामाचा प्रचंड ताण पडतो. त्यातच मनुष्यबळ अपुरे पडत असल्याने पोलिसांना बारा तासांपेक्षा अधिक वेळ ड्युटी करावी लागते. यामुळे मानसिक स्वास्थ बिघडते आणि कुटुंबीयांनादेखील पुरेसा वेळ देता येत नाही. यामुळे मुंबई पोलिस दलामध्ये आठ तास ड्युटीची मागणी जोर धरू लागली. तत्कालीन पोलिस आयुक्त २०१६ मध्ये दत्ता पडसलगीकर यांनी पोलिसांची ही मागणी प्रत्यक्षात उतरवली. काही वर्षे यशस्वीपणे सर्वच पोलिस ठाण्यामध्ये हा प्रयोग राबविल्यानंतर करोना लॉकडाउनमध्ये या प्रयोगाला खीळ बसली. कमी मनुष्यबळाचे कारण पुढे करून आठ तास ड्युटीचा प्रयोग खंडित करण्यात आला.

मुंबई पोलिस दलामध्ये सध्या भरती प्रक्रिया सुरू आहे, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान मदतीला घेण्यात आले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा आठ तास ड्युटीची मागणी जोर धरू लागली आहे. नुकत्याच पार पडलेल्या वृंद परिषदेत याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच या प्रयोग पुन्हा सर्व पोलिस ठाण्यामध्ये सुरू करण्यासाठी समिती नेमून परिस्थितीचा आढावा घेण्याचे ठरले आहे.

### आराखड्याचे सादरीकरण

- तत्कालीन पोलिस आयुक्त दत्ता पडसलगीकर यांना कॉन्स्टेबल रवींद्र पाटील यांनी आठ तास कर्तव्याचा आराखडा सादर केला.
- आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढे सादरीकरण करण्यात आले
- ५ मे २०१६ रोजी ८ तास ड्युटीची देवनार पोलिस ठाण्यातून सुरुवात
- टप्प्याटप्प्याने सर्व पोलिस ठाण्यात अंमलबजावणी
- आठ तास ड्युटीमुळे देशात मुंबई पोलिसांची चर्चा
- महिला पोलिसांना विशेष फायदा
- पोलिसांमधील कौटुंबिक कलह कमी होण्यास मदत

# २९ गावे वगळण्यासाठी ठाकरे यांना विनंती

**म. टा. वृत्तसेवा, वसई**



वसई - विरार महानगरपालिकेतून २९ गावे वगळण्यासाठी स्थानिकांनी नुकतीच उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी ठाकरे यांनी स्थानिकांसोबत असल्याची ग्वाही शिष्टमंडळाला दिली. तसेच, ग्रामस्थांच्या मागणीनुसार, गावांबाबत सरकारने काढलेल्या अधिसूचनेवर हरकती नोंदविण्याची मुदत वाढविण्याची मागणी करावी, अशी सूचना विधानपरिषदेतील विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांना ठाकरे यांनी केली.

वसई-विरार महापालिकेतून २९ गावे वगळण्यासाठी गेली १२ वर्षे गावातील नागरिक लढा देत आहेत. त्यातच उच्च न्यायालयाने गावे वगळण्यावर दाखल याचिका निकाली काढत ग्रामस्थांना दिलासा दिला. मात्र त्याआधी राज्य सरकारने २९ गावे वसई-विरार महापालिकेत विलीन करण्याची अधिसूचना १४ फेब्रुवारी २०२४ रोजी काढली. त्यामुळे स्थानिक नाराज झाले आहेत. यासाठी स्थानिकांनी ठाकरे गटाचे पालघर जिल्हा सचिव मिलिंद खानोलकर यांच्यासह पक्षप्रमुख उद्धव ठाकरे ह्यांची मातोश्री येथे भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळाने गावांच्या विलीनीकरणामुळे होणाऱ्या भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक परिणामांबाबत ठाकरे यांच्याशी पुढे चर्चा केली. तसेच या अधिसूचनेवर हरकती नोंदविण्याची मुदत ३० दिवसांची असून ती वाढविण्याची मागणी करावी अशी मागणीदेखील यावेळी त्यांनी केली. ठाकरे यांनी दानवे यांना सूचना दिल्यानंतर त्यांनी तात्काळ याबाबत नगर विकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे.

दुसरीकडे वसईमधील हरित पट्टा, तेथील गावपण, संस्कृती टिकली पाहिजे पर्यावरण वाचले पाहिजे यासाठी भूमिपुत्रांच्या ह्या लढ्यात शिवसेना भूमीपुत्राबरोबर ठाम उभी आहे, असे सांगून आपण लवकरच यावर बोलण्यासाठी वसईमध्ये येणार असल्याचे आश्वासन ठाकरे यांनी दिले.

← म.टा. ५-५-१.

CamScanner

म. टा. ५. ५. १०

# रिक्षाचालकांकडून लूट

## शेअरिंगऐवजी मीटरनुसार भाडे सुरू करण्यासाठी विरारवासी आक्रमक

- प्रवासी संघटनेचा आंदोलनाचा इशारा
- प्रवाशांकडून दुप्पट भाडेवसुली
- आरटीओंच्या निर्देशांना न जुमानता भाडेवाढ

**म. टा. वृत्तसेवा,** वसई

विरारमधील रिक्षाचालकांनी केलेली बेकायदा भाडेवाढ आरटीओने सांगितल्यानंतरही रद्द करण्यात आलेली नाही. याशिवाय करोनाकाळात झालेली अनधिकृतपणे भाडेवाढ अद्याप कायम असून बेकायदा प्रवासी वाहतूकही वाढली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा विरार येथील प्रवासी संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनाही साकडे घातले आहे.

विरारमध्ये रिक्षाचे भाडे हे मीटरवर नसून प्रति प्रवासी भाडे आकारण्यात येते. करोनाकाळात सुरक्षित वावराचा नियम पाळण्यासाठी पालघर जिल्हाधिकारी यांनी रिक्षात एकावेळी केवळ दोन प्रवासी घेण्याचे आदेश दिले होते. या नियमामुळे रिक्षाचालकांचे नुकसान होऊ नये, यासाठी एका प्रवाशासाठी दुप्पट भाडे करण्यात आले. आता करोनाचे नियम रद्द झाले असूनही प्रवाशांना दुप्पट भाड्याचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. शिवाय दोन ऐवजी चार ते पाच प्रवासी या रिक्षांमध्ये बसवले जातात. विशेष म्हणजे प्रवासी वाढवल्यानंतर भाडे पुन्हा कमी करायला हवे होते. मात्र रिक्षाचालकांकडून भाडे कमी झालेले नाही. रिक्षाचालकांनी नियमबाह्य पद्धतीने केलेल्या भाडेवाढीविरोधात विरारमधील सर्वच प्रवाशांतून विरोध होत आहे.

विरारमधील वसई- सावंतवाडी कोकण रेल्वे प्रवासी संघटनेने आणि विरारमधील प्रवाशांनी या भाडेवाढीविरुद्ध डिसेंबर २०२२मध्ये



रिक्षाप्रवासावर बहिष्कारही टाकला होता. त्यानंतर यावर तोडगा निघत बेकायदा भाडेवाढ रद्द करून लॉकडाऊनपूर्वीचे भाडे आणि प्रवासी घेण्याचे आदेश परिवहन विभागाने रिक्षाचालकांना दिले होते. या आदेशालाही आता दोन वर्षे झाली आहेत, तरीही भाडेवाढ मागे घेण्यात आलेली नसून बेकायदा चार ते पाच प्रवासी घेऊन प्रवास सुरू असल्याची तक्रार 'आम्ही वसई विरारकर प्रवासी' संस्थेने केला आहे.

### पालकमंत्र्यांना पत्र

मागील तीन वर्षांत या संस्थेच्या वतीने विविध ठिकाणी पाठपुरावा करूनही आर्थिक लूटमार थांबलेली नाही. त्यामुळे वसई विरारकर प्रवासी संस्थेच्या वतीने आता पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे बेकायदा भाडेवाढ थांबविण्याची मागणी पत्राद्वारे करण्यात आली आहे. या पत्रात, या प्रश्नावर पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काय करू शकता का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. अन्यथा महिनाभरामध्येच लोकसभेची निवडणूक येत आहे, लूटमार करणाऱ्यांना त्यांची जागा नक्कीच दाखवली जाईल, असा इशारा संस्थेचे सचिव यशवंत जडयार यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रति स्थानिक आमदार हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, खासदार राजेंद्र गावित, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, जिल्हाधिकारी पालघर यांनाही पाठवलेल्या असल्याचे जडयार यांनी सांगितले.

**“ दर दिवसाला वसई, विरारमध्ये दहा लाख रिक्षाप्रवाशांचे डबल शेअरिंग रिक्षाभाडे घेऊन त्यांची आर्थिक लूटमार केली जात आहे. मग या लूटमारीचा पैसा कोणाच्या घशात जात आहे? हा प्रश्नही उपस्थित होत आहे. यासाठी पालघर व वसई विरारमधील फसवी शेअरींग रिक्षापद्धत बंद करून मुंबईप्रमाणे येथेही मीटरनुसार भाडेपद्धत सुरू करावी.**

**- यशवंत जडयार, सचिव, 'आम्ही वसई विरार प्रवासी' संस्था**

# बेकायदा धार्मिकस्थळाला नोटीस

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर

**बांधकाम हटवण्याची महसूल विभागाची सूचना**

उत्तन परिसरातील सरकारी आणि सीआरझेडबाधित जागेत धार्मिक स्थळाचे मोठे बेकायदेशीर बांधकाम करण्यात आले आहे. या धार्मिक स्थळाला महसूल विभागाकडून आता नोटीस बजावण्यात आली आहे. यात बेकायदा करण्यात आलेले बांधकाम काढून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अन्यथा कारवाई केली जाईल, असे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.

भाईंदर पश्चिमेच्या उत्तन भागात मोठ्या प्रमाणावर सरकारी जमीन आहे. यातीलच एका सीआरझेडने बाधित असणाऱ्या जमिनीवर मधल्या काळात बेकायदेशीररित्या धार्मिक स्थळ उभारण्यात आले आहे. या धार्मिक स्थळाच्या नावे जागेचा सातबारा ते प्राचीन काळापासून असल्याने करण्यात यावा, यासाठी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना अर्ज दाखल करण्यात आला होता. धार्मिक संस्थेला त्यासंदर्भातील कोणतेही पुरावे दाखल करण्यात आले नव्हते.

त्यामुळे दाखल अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निकाली काढण्यात आला आहे. म्हणून भाजपचे नेते रवी व्यास यांनी बेकायदेशीर धार्मिक स्थळावर कारवाई करण्याची मागणी केली होती. आमदार गीता जैन यांनी हा मुद्दा विधिमंडळात उपस्थित केला होता. ह्या प्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. तसेच पोलिसांकडूनही सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हे धार्मिक स्थळ धोकादायक असल्याचा अहवाल देण्यात आला आहे.

त्यानंतर आता धार्मिक स्थळाला अप्पर तहसीलदार निलेश गोंड यांनी नोटीस बजावली आहे. यात येत्या दहा दिवसांत बांधकाम काढून घेण्यास सांगण्यात आले आहे. अन्यथा कारवाई करून त्याचा खर्च महसुली थकबाकी म्हणून वसूल केला जाईल असे म्हटले आहे.

लोकमत ५-५-२.


# अखेर काशीगाव ठाणे होणार सुरू

## राहुलकुमार पाटील यांची वरिष्ठ पोलिस निरीक्षकपदी नियुक्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या काशीगाव पोलिस ठाण्यासाठी मीरा रोडच्या सिल्व्हर सरिता भागातील पालिकेची इमारत मिळाली असून उद्या पोलिस ठाण्याचे उद्घाटन करण्याची तयारी पोलिसांनी केली आहे. या पोलिस ठाण्याचे पहिले वरिष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून राहुलकुमार पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मीरा-भाईंदर शहराची झपाट्याने होणारी वाढ पाहता ठाणे ग्रामीण पोलिस असताना काशीगाव पोलिस ठाणे मंजूर करण्यात आले होते. मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालय अस्तित्वात आल्यानंतर गेल्याच वर्षी काशीगाव पोलिस ठाणे सुरू करण्याच्या अनुषंगाने वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु पोलिस ठाणे नाही व अधिकारी-कर्मचारी नाही म्हणून काही महिन्यांतच वनकोटी यांची बदली पेल्हार पोलिस ठाण्याचे प्रभारी म्हणून करण्यात आली. त्यातच पोलिस ठाण्याच्या हद्दीबद्दल संभ्रम कायम होता.



### पोलिस ठाण्याची संख्या आता अठरा

- पोलिस आयुक्त मधुकर पांडेय, अपर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक, उपायुक्त मुख्यालय जयंत बजबळे व परिमंडळ-१ चे उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली काशीगाव पोलिस ठाणे कार्यान्वित होत आहे.
- या नवीन पोलिस ठाण्यामुळे मीरा-भाईंदर परिमंडळ-१ मधील पोलिस ठाण्यांची संख्या आता ७ झाली असून आयुक्तालयातील पोलिस ठाण्यांची संख्या १७ वरुन वाढून १८ झाली आहे.

### नकाशात तुरळक वस्तीचा भाग येतो, 'लोकमत'ने आणले निदर्शनास

पोलिस आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर काशीगाव पोलिस ठाण्याचा नमूद नकाशा पाहता हे पोलिस ठाणे केवळ नाममात्र ठरणार होते. कारण प्रसिद्ध नकाशातील हद्द पाहिली तर त्यात काशीगाव येत नाहीच, पण केवळ जंगलपट्टा, वर्सावे, चेणे व काजूपाडा आदी तुरळक वस्तीचा परिसर येत असल्याची बाब 'लोकमत'ने बातमीद्वारे निदर्शनास आणून दिली होती.

त्याची दखल घेत आता काशीगाव पोलिस ठाण्याची हद्द महेश औद्योगिक वसाहतीजवळील रस्त्यापासून काशिमीरा नाकापर्यंतची डावी बाजू ज्यात जीसीसी क्लब, मंगलनगर, काशीगाव, विनयनगर, जेपी इन्फ्रा, घोडबंदर गाव येतो. तसेच काशिमीरा पोलिस ठाण्यालगत गुन्हे शाखेच्या कार्यालयापासूनची डोंगरी झोपडपट्टी व पुढे जनतानगर, माशाचा पाडा मार्ग परिसरपासून वर्सावे, चेणे व काजूपाडापर्यंतचा परिसर या नवीन पोलिस ठाण्यात येणार आहे.

लोकमत ५.४.१.

# माजी नगरसेवकाचा महामार्गावर अपघाती मृत्यू

## टेम्पोला भरधाव कारची समोरासमोर टक्कर





टेम्पो-कारच्या धडकेत श्याम पेंढारी यांचा मृत्यू झाला आहे.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** आचोळे रोडवरील डॉन लेन परिसरात राहणारे बविआचे माजी नगरसेवक श्याम पेंढारी यांचा बुधवारी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वासमारे ब्रीजजवळ मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या आयशर टेम्पोला त्यांची भरधाव कारची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला आहे.

या अपघातात एकजण गंभीर जखमी असून, त्याला उपचारासाठी मीरा रोडच्या भक्ती वेदांत हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले आहे. श्याम पेंढारी यांची पत्नी जया पेंढारी याही माजी नगरसेविका आहेत. त्यांना मिथुन आणि अमित नावाची दोन मुले आहेत. मंगळवारी रात्री श्याम पेंढारी हे मीरा रोडला एका चालकासह ब्रिझा कारने गेले होते.

### घातपाताचा संशय

- महामार्गावरून बुधवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास ते स्वतः कार चालवत नालासोपाऱ्यातील घरी येत होते. महामार्गावर रस्त्याचे काम सुरू असून, मुंबईकडे जाणारी एक लेन गुजरात लेनवरून सुरू केली होती. याच लेनवरून मुंबईकडे जाणाऱ्या आयशर टेम्पोला त्यांची कार धडकल्याने भीषण अपघात झाला.
- नायगाव पोलिसांची टीम घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. पुढील तपास सुरू आहे. श्याम पेंढारी यांचा घातपात केल्याचा संशय व्यक्त होत आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी मुंबईच्या जे. जे. रुग्णालयात नेण्यात आल्याचे सूत्रांकडून कळते.
- आचोळे पोलिस ठाण्यात जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एका गुन्ह्यात श्याम यांचा मोठा मुलगा मिथुन हा फरार असून, लहान मुलगा अमित हा गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पोलिस कस्टडीत आहे.

# ट्रेडिंगच्या नावे फसवणूक

**नालासोपारा :** फुलपाड्याच्या श्रीकृष्णा अपार्टमेंटमध्ये राहणारे किशोर चिंदरकर (४५) यांची १९ नोव्हेंबर ते ३० जानेवारी दरम्यान ट्रेडिंगच्या नावावर लाखोंची फसवणूक झाली आहे.

ॲली वर्ल्ड कंपनीच्या तीन मोबाइलधारकांनी व्हॉट्सॲपवर संपर्क साधून त्यांना ॲलीवर्ल्ड हे ट्रेडिंगचे ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. ॲपवर ट्रेडिंग करण्यासाठी त्यांना वेळोवेळी बँकेचे खाते क्रमांक पाठवून त्यावर ३५ लाख ११ हजार १ रुपये पाठवण्यास सांगितले. त्यांनी विश्वास ठेवून ती रक्कम पाठविली. रक्कम ही ॲली वर्ल्ड या ॲपधारकांनी खात्यातून स्वीकारली. ती रक्कम कोणत्याही स्टॉकमध्ये गुंतवणूक न करता तसेच त्यांना परत न करता फसवणूक केली आहे. विरार पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.

## न्यूज Inbox

### दुकानातून रोख रक्कम चोरीला

**नालासोपारा :** कारगिलनगरच्या वैशाली सोसायटीत राहणारे राजू रावत (५०) यांचे मनवेलपाड्यात महादेव सुपर मार्केट नावाचे किराणा दुकान आहे. सोमवारी रात्री बंद किराणा दुकानाचे लोखंडी शटर उचकटून त्याद्वारे चोरट्याने दुकानात प्रवेश केला. दुकानातील टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेली २५ हजारांची रोख रक्कम चोरी करून नेली आहे. विरार पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.

### महिलेची आत्महत्या



**नालासोपारा :** फुलपाड्याच्या गोकुळधाम बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या कांचन वाडेकर (४४) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी मंगळवारी घरातील पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. विरार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

### तुळींजमध्ये रिक्षाची चोरी

**नालासोपारा :** संतोष भवनच्या भक्तिधाम येथील धनंजय प्लॉट चाळ नंबर १ मध्ये राहणारे रिक्षाचालक माताशंकर मिश्रा (५५) यांची ८० हजार रुपये किमतीची रिक्षा चोरीला गेली आहे. ८ मार्चला रात्री चाळीच्या बाहेर रस्त्याच्या बाजूला पार्किंग केलेली रिक्षा चोरट्याने चोरून नेली आहे. तुळींज पोलिसांनी मंगळवारी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

### दोन लाखांची वीजचोरी उघड

**नालासोपारा :** पापडीच्या लाझारस अपार्टमेंटमध्ये १२ महिन्यांच्या कालावधीत बिलाल काझी (४८) यांनी वीज मीटरमध्ये फेरफार करून २ लाख १८ हजार ७०० रुपये किमतीची ६ हजार ४१३ युनिटची वीज चोरून महावितरणचे नुकसान केले आहे. सहायक अभियंता कुणाल पिंपळे यांनी मंगळवारी वसई पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत ५.४.२.

# साडेचार हजारांवरून खून; आरोपीला बेड्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** साडेचार हजार रुपयांवरून झालेल्या भांडणात एकाची हत्या करून पळालेल्या आरोपीला भाईंदरच्या नवघर पोलिसांनी पश्चिम बंगालमधून अटक केली आहे.

भाईंदर पूर्व भागात १० जानेवारी रोजी मोहम्मद मुबारक अली हा इसम मद्यपान केलेल्या व डोक्याला जखम झालेल्या अवस्थेत आढळून आला होता. त्याला उपचारासाठी मुंबईच्या केईएम रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान त्याचा १४ जानेवारी रोजी मृत्यू झाला होता.

नवघर पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास चालवला होता. तपासात मोहम्मद मुबारक अली व त्याचा सहकारी करीमउल्ला खान यांच्यात भांडण झाले होते. साडेचार हजार रुपयांवरून झालेल्या या भांडणात खानने याने अली यास मारहाण केली होती. त्यात मारहाणीत अली हा जखमी होऊन नंतर मरण पावला असल्याचे उघडकीस आले. दरम्यान, अली याला मारहाण करून खान हा पसार झाला होता.

लोकमत ५.४.३.

# वन्यप्राण्यांच्या शिंगासह दोन आरोपींना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पेल्हार पोलिसांनी दोन आरोपींना लाखो रुपये किमतीच्या सांबर या वन्यप्राण्यांच्या तीन शिंगांसह मंगळवारी संध्याकाळी पकडले आहे. पोलिसांनी लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केला असून, गुन्हा दाखल करत दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

पेल्हार पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे पेल्हारच्या ॲप्पल इंडस्ट्रीसमोर मंगळवारी दुपारी रिक्षा थांबवून तिची झडती घेतली. या वेळी रिक्षाचालक मोहम्मद इम्रान शहा (४२) आणि अशोक पटेल (५८) यांच्याकडे सांबर या वन्यप्राण्यांचे ५० हजार रुपये किमतीचे तीन टोक असलेले शिंग जवळ बाळगणे अथवा विक्रीचा परवाना नव्हता. त्या दोघांनी सांबरचे शिंग विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगलेले मिळून आले. पोलिसांनी ५० लाख किमतीचे शिंग, १ लाखाची रिक्षा, दोन मोबाइल असा एकूण ५१ लाख २० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

CamScanner